PC 5 D:/Regular-17/roshan new shelar/Circular (Pra)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2019-20)/01/ of 2019**

## परिपत्रक:

विषय:— आग आणि निर्वासन ड्रिल प्रशिक्षण सर्व महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्याबाबत.

संदर्भ:— उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे क्र. संकीर्ण २०१९/प्र. क्र. ६३/ विशी—३ दिनांक २५ मार्च, २०१९ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, गृह मंत्रालय, अग्नीशमन सेवा, नागरिक सुरक्षा, भारत सरकार यांचे दिनांक ११ सप्टेबर, २०१८ चे पत्र सोबत जोडले आहे.

मा. पंतप्रधान यांनी पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक यांच्या बैठकीमध्ये सर्व शाळा, महाविद्यालयांमध्ये आगीपासून सुरक्षेकरीता "Fire & Evacuation Drills" चे दृढीकरण पध्दतीने प्रशिक्षण देण्याच्या सूचना आल्या आहेत. सदर सूचनांनुसार सर्व महाविद्यालयांमध्ये स्थानिक अग्निशामक दल/ अधिकारी यांच्या मदतीने "National Fire & Evacuation Drills" आयोजित करण्याची विनंती केली आहे.

त्याअनुषंगाने संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक यांना सुचित करण्यात येत आहे की, आपल्या महाविद्यालयांमध्ये स्थानिक अग्निशामक दल/ अधिकारी यांच्या मदतीने "National Fire & Evacuation Drills" आयोजित करून त्याचा अहवाल महाराष्ट्र शासनास सादर करावा.

मुंबई—४०० ०३२
03 एप्रिल, २०१९

(डॉ अजय देशमुख)
कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक.